प्रेसनोट दि. २५/०८/२०१८

**फेक फेसबुक अकांउट तयार करुन तरुणीची बदनामी करणारा आरोपी सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांचे ताब्यात**

पुणे शहरातील रा.तुकाई दर्शन,हडपसर,पुणे या भागात राहाणा-या महीला तक्रारदार यांनी सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांचेकडे त्यांचे नावाचा व फोटोचा वापर करुन अज्ञात इसमाने फेसबुक या सोशल साईटवर वेगवेगळे अनेक फेक फेसबुक अकाउंन्ट २०१३ पासून तयार करुन त्यावर त्यांची बदनामी केली असलेबाबत तक्रारी अर्ज प्राप्त झाला होता. अधिक चौकशीअंती गैरअर्जदार नील जॉर्ज, वय - ४२ वर्ष, व्यवसाय- नोकरी (मर्क्स ग्लोबल प्रा.लि), सध्याचा पत्ता रा. प्लॉट नं. १८, डीजनी पार्क, आझाद नगर,वानवडी पुणे, याने सदरचा प्रकार केल्याचे निष्पन्न झाले त्यास ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता त्याने फिर्यादी यांचे रेडीफ मेलचा मेल आयडीचा अनधिकृतरीत्या ॲक्सेस घेवून त्यावर असणाऱ्या फोटो चोरुन फिर्यादीचे नावाने फेक फेसबुक अकाउंट तयार करुन त्यांचे फोटो पोस्ट करुन फिर्यादी यांची बदनामी करत होता. तसेच फिर्यादी यांचे मित्राच्या बायकोला मेसज पाठवून फिर्यादी व फिर्यादी यांचे बाबत गैरसमज निर्माण करीत होता. सदर बाबत चौकशी करीता फिर्यादी व आरोपी हे एकाच कंपनीत कामास असून आरोपी हा फिर्यादी यांचे वर एकतर्फी प्रेम करत होता. फिर्यादी हे त्यास प्रतिसादर देत नसल्याने सदरचे कृत्य केले आहे. सदर आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करुन कारवाई करणेकामी त्यास हडपसर पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस उप-आयुक्त ज्योतीप्रिया सिंह, सहा.पोलीस आयुक्त समीर शेख, वरिष्ठ पोलीस निरिक्षक राधिका फडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि मंदा नेवसे व कर्मचारी मपोशि ज्योती दिवाणे, पो.शि भुषण शेलार., या पथकाने कारवाई केली आहे.